# पीक संशोधनासाठी महिंद्रा-केजीनी करारबद्ध

**नवी दिल्ली :** वाहन आणि ट्रॅक्टरसह कृषी उपकरण निर्मिती क्षेत्रात देशात अग्रणी असलेल्या महिंद्रा अँड महिंद्रा उद्योग समूहातील घटक कंपनी महिंद्रा ॲग्री सोल्यूशन्स लिमिटेड आणि नेदरलँडमधील केजीनी कंपनी यांच्या प्रमुख पिकांमध्ये संयुक्तपणे संशोधन करण्यासाठी करार करण्यात आला आहे. केजीनी ही पिकांमध्ये नावीन्यकरण करणारी कंपनी असून कंपनीच्या अमेरिका आणि भारतात शाखा आहेत. महिंद्रा ॲग्री सोल्यूशन्स लिमिटेड महिंद्रा अँड महिंद्रा समूहातील सहयोगी कंपनी आहे. महिंद्रा समूहाची एकूण वार्षिक उलाढाल २०.७ अब्ज डॉलर आहे. केजीनीच्या पीक नावीन्यकरण मंचाचा वापर देशात आर्थिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आणि बाजाराच्या दृष्टिकोनातून उपयुक्त पिकांच्या जाती विकसित करण्यासाठी करण्यात येणार आहे. उभय कंपन्यांमधील या तंत्रज्ञान सहकार्यामुळे पिकांची उत्पादकता वाढवण्यास मदत मिळेल आणि पिके हवामान बदल सोसण्यासाठी अधिक सक्षम करता येतील.